लोकमत पु. पान क्र. १

# फ्लॅट विक्रीच्या नावाने १४.५० लाखांची फसवणूक

लोकमत न्यूज़ नेटवर्क

**मीरा रोड :** आधी नायगाव व नंतर वसई येथे फ्लॅट घेऊन देतो, असे सांगून एका महिलेची साडेचौदा लाखांनी फसवणूक केल्याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

दहिसर पूर्वेच्या एस. व्ही. मार्गावर राहणाऱ्या भावना मोकाशी या सदनिका खरेदीच्या शोधात होत्या. त्यांचे भावोजी इर्शाद शेख यांच्या ओळखीतून त्यांची स्वतःला बिल्डर सांगणाऱ्या दत्त वाळूंजसह अल्ताफ हसन कुरेशी यांच्याशी ओळख झाली होती. वाळूंज याने आपल्याला पैशांची गरज असल्याने नायगाव येथील फ्लॅट ११ लाखांना विक्री करायचा सांगितले. भावना यांनी त्यास तयारी दर्शवत वाळूंज यांना रोख व धनादेशामार्फत ११ लाख रुपये दिले. चंद्रपाडा येथील श्री सद्गुरू अपार्टमेंट येथील सुनीलदत्त तिवारी यांच्या फ्लॅटचे ॲग्रीमेंट फॉर सेल नोटरीचे ७ लाख रुपये किमतीचे कागदपत्र बनवून दिले.

यानंतर मात्र वाळूंज हा फोन उचलत नसल्याने इर्शाद व त्यांचा मोठा भाऊ नौशाद शेख याला अल्ताफ कुरेशीने नायगावऐवजी वसईच्या एव्हरशाईन येथील फ्लॅट घ्या, तो चांगला आहे, असे सांगितले.



## पोलिस तपास सुरू

- वसईचा फ्लॅट पसंत पडल्याने नोंदणीसाठी ३ लाख ४२ हजार रुपये वाळूंजच्या खात्यात जमा केले. दत्ता वाळूंजसह अल्ताफ कुरेशी, रफिक शेख व यासीन शेख हे भावना आदींना नोंदणीसाठी म्हणून विरार येथे भेटले. त्यावेळी वाळूंजने हसन अपार्टमेंट, सेक्टर ६, एव्हरशाईन नगर येथील सदनिकेची पावर ऑफ ॲटर्नी नोंदणी करून देत सदनिकेची चावी दिली.
- त्यात काही सामान होते. ते सामान काढण्यासाठी म्हणून अल्ताफ चावी घेऊन गेला. नंतर त्याने चावी आणून दिली नाही. वाळूंज याने सदनिका दिली नाही व पैसे परत दिले नाहीत. अखेर भावना यांच्या फिर्यादीवरून काशिमीरा पोलिसांनी १६ एप्रिल रोजी वाळूंज, अल्ताफ, रफिक व यासिन या चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक निखिल चव्हाण हे तपास करत आहेत.

# लॉजमध्ये केली आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** काशिमीरा पोलिस ठाणे हद्दीतील रिजन्सी लॉजिंगमध्ये महर्षी भगवती प्रसाद जोशी (वय ३१, रा. दहिसर पूर्व) या तरुणाने आत्महत्या केली आहे.

महर्षी याने लॉजच्या रूममधील पंख्याला शर्टच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. काशिमीरा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद १६ एप्रिल रोजी केली आहे. आत्महत्येचे कारण अजून समजलेले नाही.

# माणिकपूरमध्ये वीजचोरीचा गुन्हा

**नालासोपारा :** वसईच्या माणिकपूर येथील जॉसेफ मेनेझिस या वीजग्राहकाने वीज वितरण कंपनीची १ मार्च २०२३ ते २८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीमध्ये ४०,४२० रुपये एवढ्या रकमेची वीजचोरी करून महावितरणचे आर्थिक नुकसान केले आहे. महावितरणचे प्रशांत आडभाई यांनी बुधवारी माणिकपूर पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. वसई-विरार परिसरात वीजचोरीच्या घटनांत वाढ झालेली असून महावितरणने वीजचोरांविरुद्ध धडक मोहीम हाती घेतली आहे.

# रस्त्यात बसण्याच्या वादातून चाकूहल्ला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तुळींज रोडवरील काजूपाडा परिसरातील लाडक्या पंजी चाळ येथे राहणाऱ्या गणेश जैस्वाल (३०) याच्यावर रस्त्यावर बसण्याच्या वादातून चाकू हल्ला केल्याची घटना घडली आहे. तुळींज पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

गणेश हे सोमवारी रात्री सव्वादोन वाजण्याच्या सुमारास तुळींज ओव्हर ब्रीजखालील भाजी मार्केट येथे जिन्यावरून उतरत असताना हल्ला झाला आहे. आरोपी राहुलकुमार दुबे उर्फ पंडित (२२) व दिव्याश यादव उर्फ टकला (१९) यांच्याबरोबर गणेश हे जाताना रस्त्यामध्ये बसल्याच्या कारणावरून वाद झाला. गणेशला त्या दोघांनी शिवीगाळ, धक्काबुक्की करून पोटाच्या डाव्या बाजूला चाकूने दोन वेळा भोसकून जखमी केले.


# अल्पवयीन मुलीचे अपहरण



**नालासोपारा :** विरारच्या फूलपाडा परिसरात राहणाऱ्या १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना मंगळवारी संध्याकाळी घडली आहे. आरोपीने तिला कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेले आहे. मुलीच्या आईने बुधवारी विरार पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. विरार पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

CamScanner

लोकमत पु. पान ५



प्रभाग समिती 'जी'अंतर्गत राजावली डांबर प्लॉट व वाघराळ पाडा येथे सुमारे २८,२५० चौरस फुटांच्या अनधिकृत बांधकामावर गुरुवारी पालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली.

# अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

## वसई-विरार महापालिकेची 'जी' प्रभागांतर्गत कारवाई

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** प्रभाग समिती 'जी'अंतर्गत राजावली डांबर प्लॉट व वाघराळ पाडा येथे १६ गाळे, १७ रूम व ८० पायाचे (प्लिंथ) असे अंदाजे २८ हजार २५० चौरस फुटाच्या अनधिकृत बांधकामावर गुरुवारी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करत ते जमीनदोस्त केले.

वसई - विरार महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार व अतिरिक्त आयुक्त (दक्षिण) संजय हेरवाडे यांच्या आदेशानुसार उपआयुक्त अजित मुठे (अतिक्रमण विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केली गेली.

या मोहिमेदरम्यान उपायुक्त अजित मुठे, प्रभाग समितीचे प्रभारी सहायक आयुक्त मनाली शिंदे, वरिष्ठ लिपिक विजय नडगे, लिपिक सुनील तेलगोटे, मजूर व कर्मचारी उपस्थित होते.

# गतिमंद तरुणीवर अत्याचार करणाऱ्यावर गुन्हा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरा रोडच्या काशीगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका ३२ वर्षीय गतिमंद तरुणीवर सातत्याने अत्याचार करून तिला गर्भवती करणाऱ्या ३५ वर्षीय व्यक्तीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

ती गतिमंद मुलगी मानसिक रुग्ण असल्याची कल्पना असूनदेखील तिच्या अजाणतेपणाचा व असहायतेचा गैरफायदा घेऊन आरोपीने फेब्रुवारी २०२३ ते एप्रिल २०२४ या काळात तिच्यावर सातत्याने अत्याचार केला. त्यामुळे ती गर्भवती राहिली. ही बाब लक्षात आल्यानंतर तिच्या वडिलांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी नराधमावर १७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राहुल सोनवणे हे तपास करत आहेत. आरोपीचा पत्ता माहिती नसल्याने पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

CamScanner

પુણ્યનગરી પૃ. પાન ક્ર. ૧

# वसई-विरारमधील धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

## जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण अद्यापही झालेले नाही

। विजय देसाई

**नालासोपारा :** वसई विरार महापालिकेच्या हद्दीतील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वसई विरार नालासोपारा शहरात अनेक इमारती धोकादायक स्थितीत आहेत. काही इमारती अतिधोकादायक आहेत. दरवर्षी पालिका धोकादायक इमारती घोषित करून त्यांना नोटिसा बजावते. त्यापैकी काही इमारती तोडण्यात आल्या, पण काही धोकादायक इमारती अजूनही उभ्या आहेत. त्या कधीही पडण्याच्या स्थितीत आहेत. अशा धोकादायक इमारतींना नोटिसा पाठवून पालिकेने आपली जबाबदारी पार पाडली आहे.




पावसाळ्यात एखादी अप्रिय घटना घडून काही जीवितहानी झाली तर आम्ही नोटीस पाठवली होती, असे बोलण्यास पालिका व अधिकारी मागे पडणार नाही, एवढे मात्र खरे!

वसई विरार शहरात शेकडो इमारती आहेत. ज्या अतिशय जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत. या मोडकळीस आलेल्या इमारतींमधून अपघात होऊ शकतात. मुसळधार पावसात कधीही कोसळणाऱ्या अशा अनेक इमारती आहेत. जीर्ण इमारतींमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याबाबत पालिका अधिकारी गंभीर नसल्याचे नागरिक सांगतात. पालिका अपघात होण्याची वाट पाहत आहेत का, असा संतप्त सवालही विचारला जात आहे. प्रत्यक्षात पावसापूर्वी शहरातील जुन्या इमारतींचे सर्वेक्षण अधिक आहे. मात्र पालिकेने यावर्षी आतापर्यंत जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण केलेले नाही. गेल्या वर्षी २०२३ मध्ये पालिकेने सुमारे ३०० इमारतींची यादी जारी केली होती. त्यात ६९ इमारती पावसाळ्यापूर्वी जीर्ण झाल्याचा उल्लेख होता.

वसई-विरार शहरात कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडू नये, यासाठी पालिकेतर्फे दरवर्षी शहरातील धोकादायक इमारती आणि अतिधोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केले जाते. त्यानंतर यादी तयार करून त्यांना नोटीस पाठवली जाते आणि त्यांना सूचना दिल्या जातात. अशा धोकादायक इमारतींची चार श्रेणींमध्ये विभागणी करतात. ज्यात अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना बाहेर काढून इमारत पाडायची असते. ताबडतोब, वर्ग दोनच्या इमारती पाडल्या जातात आणि त्यांची दुरुस्ती केली जाते. तर वर्ग तीनच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाते. मात्र एप्रिल महिना अर्धा संपलेला असताना पावसाळ्याला दीड महिना बाकी असूनही पालिकेने अद्याप जीर्ण इमारतींची यादी जारी केली नसल्याने शहरातील जीर्ण इमारतींचा प्रश्न गंभीर बनला आहे.

### मूलभूत सार्वजनिक कामे ठप्प

निवडणूक आयुक्तांनी सर्व अधिकाऱ्यांची ड्युटी निवडणुकीत लावल्याचे येथील संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या कामात व्यत्यय येत आहे. ३० लाख लोकसंख्या असलेल्या पालिकेतील प्रत्येक अधिकारी निवडणूक ड्युटीवर रुजू झाल्यामुळे मूलभूत सार्वजनिक कामे ठप्प झाली आहेत. दरम्यान पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सर्व विभागीय अधिकाऱ्यांना आपापल्या भागातील मोडकळीस आलेल्या इमारतींचे सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे, असे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

CamScanner

पुण्यनगरी पृ.पान क्र.1

# क्षुल्लक कारणावरून एकाची हत्या

## आरोपीला अटक

**नालासोपारा** : शिवीगाळ केल्याच्या रागातून आरोपीने एका तरुणाला जोरात धक्का देऊन त्याला खाली पाडले. त्याच्या पोटात लाथाबुक्क्यांनी मारहाण करून हत्या केल्याची घटना वाकणपाडा नाका येथे सोमवारी मध्यरात्री घडली आहे. मंगळवारी पेल्हार पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

वाकणपाड्याच्या विष्णू चाळ येथे राहणाऱ्या गीतादेवी बिन (३६) यांच्यासमोर पती अक्षयकुमार बिन (३६) यांची सोमवारी रात्री हत्या करण्यात आली आहे. वाकणपाडा नाका येथील विंध्यावासिनी देवीच्या मंदिरासमोर फळविक्री करणाऱ्या आरोपी शिवप्रसाद जयस्वाल याला अक्षयकुमार याने दारूच्या नशेत शिवीगाळ केली. शिवप्रसाद जयस्वाल याने या घटनेचा राग मनात धरून अक्षयकुमार बिन यास धक्का मारून जमिनीवर पाडले. नंतर आरोपीने त्याचे दोन्ही पाय उचलून त्याच्या पोटावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारले आहे. याबाबत फिर्यादी गीतादेवी यांनी मंगळवारी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार देऊन हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. हत्येच्या गुन्ह्यात आरोपीला अटक करून वसई न्यायालयात हजर केल्यावर चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

लोकसत्ता पृ.पान क्र.1

# सिमेंट रस्त्याच्या कामांवर वाहतूक पोलिसांची नाराजी

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर** : मिरा-भाईंदर शहरात जागोजागी सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या भोंगळ कारभाराविरोधात वाहतूक पोलिसांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे या कामाभवती आवश्यक उपाययोजना उभारण्यासह पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याची सक्त ताकीद पोलिसांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिली आहे.

शहरातील बहुतांश भागात सध्या सिमेंट काँक्रीटचे रस्ते उभारण्याचे काम सुरू आहे. हे काम एमएमआरडीमार्फत केले जात असून मोजक्याच ठिकाणी पालिकेच्या कामाचा समावेश आहे. मात्र शहरात जागोजागी सुरू असलेल्या या कामाचा मोठा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. त्याचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवर होत आहे. याबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढल्यानंतर या संदर्भात पोलिसांनी नुकतीच पालिका अधिकारी व कंत्राटदारांची संयुक्त बैठक बोलावली. यावेळी समस्या दूर करण्यासाठी कामास्थळी सुरक्षा आवरण उभारणे, वाहतूक कर्मचारी तैनात ठेवणे आणि दिशादर्शक फलक उभारण्याचे सक्त आदेश पोलिसांनी यावेळी दिले आहेत. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करून घ्यावे, अन्यथा त्यानंतर कोणतेही काम करू दिले जाणार नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

सकाळ पान क्र 5

# सांडपाण्याच्या टाकीत गुदमरून कामगाराचा मृत्यू

**बोळिंज, ता. १८ (बातमीदार)** : विरारमध्ये सांडपाण्याच्या टाकीत गुदमरून चौघांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच आता वसईत अशीच घटना घडली आहे. सांडपाण्याच्या टाकीची साफसफाई करण्यासाठी उतरलेल्या एका सफाई कामगाराचा गुदमरून मृत्यू झाला. चिंचपाडा येथे ही दुर्घटना घडली.

वसई पूर्वेच्या चिंचपाडा येथे एव्हरशाईन इंडस्ट्री आहे. येथील सांडपाण्याची टाकी साफ करण्यासाठी दुपारी तिरुपती भुट्टे (वय ३३) या सफाई कामगाराला बोलावण्यात आले होते. दुपारी तीनच्या सुमारास तो टाकीत उतरला होता. टाकीतील विषारी वायूमुळे त्याचा श्वास गुदमरून तो बेशुद्ध झाला. त्याला उपचारासाठी आधी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. नंतर प्रकृती खालावल्याने पालिकेच्या सर डी. एम. पेटिट रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

पुढारी पृ.पान 1

# वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पालघर** : पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग वसई फाटाच्या उड्डाणपुलाजवळ अपघातात एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे वय सुमारे ४० वर्षे असल्याचा अंदाज आहे. अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे हा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे. पेल्हार पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात वाहनाविरुद्ध व वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

पुढारी पृ. पान क्र. १

## रिक्षावाल्यांच्या दादागिरीने प्रवासी हैराण

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार शहरात रात्रीच्या वेळी काही रिक्षावाल्यांचा वेगळा चेहरा समोर येत आहे. दिवसा प्रवाशांच्या मर्जीने चालणारे हे रिक्षावाले जणू काही रात्रीच्या वेळेस दादागिरी केल्यासारखे वागत आहेत. त्यामुळे प्रवासी हैराण झाले आहेत. यामुळे पोलिसांनी रात्रीच्या वेळी गस्त वाढवून या रिक्षाचालकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

वसई विरार शहरात रिक्षाचे दिवसाचे आणि रात्रीचे दोन वेगळे जग निर्माण होत आहे. सध्या वसई विरार मध्ये भाडेवाढीमुळे रिक्षाचालक व प्रवाशांत तणाव वाढत चालल्यामुळे रिक्षाचालक, प्रवाशी यांचे खटके उडतात. रस्त्यात वाट्टेल तिथे रिक्षात प्रवासी भरणे, उतरवणे, इतर वाहनांचे मार्ग अडविणे, रात्रीच्या वेळी तीन, चार रांगा लावत रस्ता पॅक करणे असे प्रकार दिसून येतात. दरम्यान खासगी रिक्षाचे रात्री दुपटीने दर आकारला जात असल्याने प्रवाशांची आर्थिक लूट होत आहे. रात्री बहुतांश रिक्षाचालक गणवेशात नसतात, मात्र वाहतुकीची साधने नसल्याने प्रवाशांचा नाईलाज होत असल्याचे प्रवासी संदीप हिरिये यांनी सांगितले.

## रुग्ण महिलेवर अत्याचार

**पालघर :** एका डॉक्टरने रुग्ण महिलेसोबत अत्याचार केल्याची घटना समोर आली असून पीडित महिलेने नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर डॉक्टरांवर अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालासोपारा पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये छेडामार्ग स्थित एका छोटा दवाखान्यात हा डॉक्टर आठवड्यातून दोन वेळा या दवाखान्यात येत असतो. मंगळवारी दुपारच्या सुमारास पीडित महिला उपचारासाठी या दवाखान्यात गेली होती. त्यावेळी डॉक्टरांनी तिच्यावर अत्याचार केल्याचे तिचे म्हणणे आहे. पीडितेच्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर या प्रकरणात तपास सुरू केला आहे.

## नशेत आत्महत्या

**पालघर :** दारूच्या नशेत पत्नीसोबत भांडण झाल्यानंतर एका व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. बिलालपाडा येथे राहणाऱ्या दीपक मेहरा असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव असून मंगळवारी त्याने राहत्या घराच्या छतावरील लोखंडी पाईपला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला. पेल्हार पोलिसांनी सदर घटनेची आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## कारमधून पैशाची बॅग चोरीस

**पालघर :** एका कारमधून पैशाची बॅग चोरीला गेल्याची घटना तुळींज पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. दीपक यादव यांनी सोमवारी एका दुकानासमोर आपली कार पार्क केली होती. कारच्या पुढच्या आसनावर अडीच लाख रुपयांची रक्कम असलेली बॅग ठेवली होती. हे पैसे कामगारांना देण्यासाठी त्यांनी आणले होते. मात्र अज्ञात चोरट्याने कारमधून बॅग चोरल्याने यादव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## वजनी बॉक्सखाली चेंगरून मुलाचा मृत्यू

**पालघर :** मांडवी पोलीस ठाणे क्षेत्राच्या खानिवडे पुलाजवळ टेम्पोच्या मागील वजनी लाकडी बॉक्सखाली चेंगरून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. संजय कवठिया त्यांच्या पत्नी व तीन मुले सोमवारी रात्रीच्या सुमारास टेम्पोच्या पाठीमागे बसून जात होते. त्यावेळी खानिवडे पुलाजवळ अचानक समोर गाडी आल्याने टेम्पो चालकाने ब्रेक लावला. या घटनेत टेम्पोमध्ये असणारा वजनी लाकडी बॉक्स सरकला. त्यामुळे विराट कवठिया या मुलाचा चेंगरून मृत्यू झाला. मांडवी पोलिसांनी मंगळवारी टेम्पो चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

दैनिक यशोभूमि


# यातायात विभाग ने ठेकेदारों के साथ की बैठक

**यशोभूमि / प्रतिनिधि**

**मीरा रोड।** मीरा-भाईंदर शहर के अंतर्गत विकास के कई महत्वपूर्ण कार्य चल रहे हैं, जैसे मेट्रो, सड़क एवं सूर्या परियोजना के तहत पेय जल आपूर्ति के लिए

## सड़क व अन्य कार्य पूरा करने का निर्देश

पाइप बिछाने का कार्य, इत्यादि और इन कार्यों के चलते शहर की ट्रैफिक व्यवस्था चरमरा गई है और मानसून भी अब नजदीक है और मानसून में ट्रैफिक व्यवस्था सुचारु ढंग से चले, अतः मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत यातायात विभाग (मी. भा.) के वरिष्ठ पुलिस निरीक्षक हंडोरे ने उक्त निर्माण कार्य कर रहे सभी ठेकेदारों के साथ अहम बैठक की। उक्त बैठक में उपस्थित विभिन्न सड़क निर्माण कंपनियों के प्रतिनिधियों को मीरा-भाईंदर शहर में चल रहे सड़क व अन्य कार्य को मानसून से पहले पूरा करने और शेष कार्य मानसून समाप्त होने के बाद ही शुरू करने का निर्देश दिया गया है एवं जिन स्थानों पर कार्य



चल रहा है, वहां यातायात सुचारु रखने के लिए ट्रैफिक वार्डन, कार्य स्थल पर बैरिकेडिंग, रेडियम पट्टी, नाइट ब्लिंकर, ट्रैफिक कोन का उपयोग करें, जिससे नागरिकों को कोई असुविधा न हो, यह भी निर्देश दिया गया।



CS CamScanner